# रसेयो च्या विशेष हिवाळी शिबिराचा अहवाल २०२२-२३

मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिराचे उद्धाटन

शिरसोलीयेथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एस. एस. मणियार विधीमहाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबिराचे उद्धाटनखिरोदा येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एस.टी. भूकन यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमाररेड्डी, बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीएस. एस. बारी, बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्षॲड. प्रविण पाटील, शिरसोलीचे सरपंच प्रविण दामधर, शालेय समितीचे अध्यक्षश्री कमलाकर तांदळे, श्री गोपाळ बारी कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपत धुमाळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. स्वाती लोखंडे मंचावर उपस्थित होते. यावेळीमार्गदर्शन करताना डॉ. भुकन यांनी रासेयो चे उद्दीष्ट स्पष्ट करूनयुवकांचे विचार आचार विकसित करण्यात या उपक्रमाचे महत्व अधोरेखित केले.तत्पूर्वी प्राचार्य डॉ रेड्डी यांनी समतेचे तत्व प्रस्थापित करण्यासाठीराष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची जबाबदारी काय आहे ते स्पष्ट केले. तसेचबारी सरांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे महत्व सांगून सर्व प्रकारच्यासहकार्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्राधुमाळे यांनी केले तर शेवटी मान्यवरांचे आभार निलेश बारी यांनी मानले.







तसेच सायंकाळी कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रासेयो विभागाचेसंचालक डॉ सचिन नांद्रे यांनी भेट देऊन स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवायोजनेच्या विविध उपक्रमाबद्दल मार्गदर्शन करून स्वतःच्या सर्वांगिणविकासासाठी लाभ घेण्याचे व समाजाप्रतीची जबाबदारी पार पाडावी असे आवाहनकेले







तसेच विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने परिसरातीलजळके टेकडी येथे स्वच्छता करून त्यात पाणी अडवण्यासाठी काही शोषखड्डेकरण्यात आले जेणेकरून भविष्यात गावाची पाण्याची पातळी

उंचावेल.तसेच त्यानंतर जे. के. इंडस्ट्रीज येथे भेट देऊन तेथील माहिती देण्यात आली. नोकरी मागण्यापेक्षा देणारे बना असा संदेश देण्यात आला.












तसेच डॉ प्रकाश कांबळे सर यांनी ग्रामविकासासाठी महात्मा गांधी, संततुकडोजी महाराज, वारकरी संप्रदाय, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचेविचार कसे महत्त्वाचे आहेत हे आजच्या तरुण पिढीला आपल्या व्याख्यानातूनविद्यार्थ्यांना पटवून दिले.

त्यानंतर विधीमहाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ योगेश महाजन सर पर्यावरण संरक्षणात गावांचीभूमिका या विषयांवर शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पर्यावरणविषयक कायदेशीर तरतुदीची माहिती सांगितली. संध्याकाळी विद्यार्थ्यांच्याआरोग्यासाठी व सुदृढ शरीराचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांचे आरोग्यसुदृढ राहण्यासाठी नवनवीन खेळ घेण्यात आले तसेच विद्यार्थ्यांमध्येलोककलेचा जागर होण्यासाठी विशेष संगीत संध्येचे आयोजन देखील रात्रीच्यासत्रात करण्यात आले. व कार्यक्रमाचा समारोप शुभम तायडे यांनी केला





एस. एस मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकक व बारी समाजमाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने शिरसोली येथे जनजागृतीफेरीचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा गणपत धुमाळे, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा स्वाती लोखंडे, विद्यालयाचे शिक्षक आर. के.पाटील, एस.आर. बारी, श्री काटोले व रासेयो स्वयंसेवक









गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यासाठी आजशिबिरातील स्वयंसेवकांनी गावातील बाजारपेठेचा भाग स्वच्छ केला व तसेचस्वच्छतेचे महत्त्व आणि घाणीमुळे होणारे दुष्परिणाम विद्यार्थ्यांनी आपल्याउद्बोधनाद्वारे समजावून सांगितले. तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. गणपतधुमाळे व महिला कार्यक्रम अधिकारी प्रा स्वाती लोखंडे यांनी व्यक्तीश:सहभागी होऊन स्वयंसेवकांना निर्देशित केले.

दरम्यान स्वयंसेवकांनी गावातीलस्वच्छता कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी सहसंवेदना व्यक्त केली वत्यांच्या समस्या समजून घेतल्या पुढे गाव स्वच्छतेसाठी काही उपाययोजनाआपणास राबवता येतील का याबद्दल सकारात्मक चर्चा देखील घडवून आणली.










त्यानंतरआंतरराष्ट्रीय तृणधान्ये वर्ष निमित्ताने कृषी विभागाचे तंत्रज्ञानव्यवस्थापक नरेंद्र पाटील यांनी मार्गदर्शन केले, कृषी सहायक डी. बी.पाटील, कमलेश पवार, भरत पाटील यांनीही मार्गदर्शन केले व पौष्टिक तृणधान्येआपल्या आहारात समावेश करण्याची शपथ दिली. तसेच डॉ. पाहुजा यांनी ग्राहकसंरक्षण कायदा संदर्भात मार्गदर्शन केले.






तसेच जनप्रबोधनाचे साधन कीर्तन या माध्यमातूनही अंधश्रद्धा, स्त्रीभ्रूण हत्या विरोधी, बलविवाह विरोधी मुद्यावर जनजागृती करण्यात आली. लोकांचा उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.










त्याचबरोबर कृषि विभागाच्या समन्वयाने आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त फेरीच्या माध्यमातून व घरोघर सर्वेक्षण करून जनजागृती करण्यात आली.





तसेच शाहीर विनोद ढगे आणि त्यांच्या टीम च्या वतीने व रसेयो स्वयंसेवक व्यसनाधीनता, बुवाबाजी, स्वछता संदर्भात पथ नाट्याच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले.





अशाप्रकारे महाविद्यालय शारीरिक श्रम आणि वैचारिक प्रबोधनाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे आणि स्वताच्याही आकलनात भर घालून हिवाळी शिबिराची संगत करण्यात आली. शिबिराच्या समरोपास केसीई सोसाइटी चे सहसचिव अड. प्रमोद पाटील, रसेयो चे विभागीय समन्वयक डॉ. नितीन बडगूजर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवकुमार रेड्डी, प्रा. बी. एस. पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केली. त्यानंतर अड. प्रमोद पाटील यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विशेष हिवाळी शिबिरातून मिळालेली शिदोरी आयुष्यभर कामी येते आणि सर्व उपस्थित स्वयंसेवकाच्या व्यक्तिमत्वात त्याचा प्रभाव पडेल असे सांगून उपस्थितांचे कौतुक केले.



# विधी महाविद्यालयाचे विशेष हिवाळी शिबिर

**प्रतिनिधी** | जळगाव

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित एस. एस. मनियार विधी महाविद्यालयाचे शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत विशेष हिवाळी शिबिर घेण्यात आले. शिबिरात 'बेटी बचाव बेटी पढाव', व्यसनमुक्ती, जलसंधारण, मृदसंधारण, आरोग्य, प्रबोधन, स्वच्छता, ग्राहक संरक्षण कायदा, जादूटोणा विरोधी कायदा, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष असे विविध उपक्रम घेण्यात आले. शिबिरात शिरसोली गावातील टेकडीवर मृदसंधारणाचे काम करण्यात आले. गावात प्रभातफेरी काढण्यात आली. समारोपाला सहसचिव अॅड. प्रमोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. नितीन बडगुजर, प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. गणपत धुमाळे, प्रा. स्वाती लोखंडे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम घेण्यात आले. यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.



# विधी महाविद्यालयाच्या रासेयोच्या शिबिरात सामाजिक विषयावर प्रबोधन

प्रतिनिधी | जळगाव

[illegible]



शिरसोली येथे जनप्रबोधन करताना विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

# तृणधान्य जनजागृती विद्यार्थ्यांचाही सहभाग

ॲग्रोवन वृत्तसेवा

जळगाव : जिल्ह्यात तृणधान्य वर्षानिमित्त ग्रामीण भागासह शहरी भागातही जनजागृती केली जात आहे. जळगाव शहरातील खानदेश कॉलेज एज्युकेशन(केसीई) सोसायटी संचलित एस. एस मणियार. विधी महाविद्यालयातर्फे शिरसोली (ता. जळगाव) गावात या उपक्रमांतर्गत नुकतीच जनजागृती करण्यात आली.

शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष हिवाळी शिबिरांतर्गत हा कार्यक्रम झाला. बेटी बचावो बेटी पढावो, व्यसनमुक्ती, जलसंधारण, मृदाधारण, आरोग्याबाबत प्रबोधन, स्वच्छता, ग्राहक संरक्षण कायदा, जादूटोणाविरोधी कायदा, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष २०२३ आदी विविध उपक्रम घेण्यात आले.

शिरसोली गावात एका टेकडीवर मृदसंधारणाचे काम करण्यात आले. प्रभात फेरी काढून जनजागृती व सर्वेक्षण करण्यात आले, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त ज्वारी, बाजरी, नाचणी, वरई, राजगिरा, भगर, कोडा या संदर्भात माहिती देण्यात आली. विद्यार्थिनी माईसाहेब यांच्या कीर्तनाचे बाजारपेठेत आयोजन करण्यात आले होते. या शिबिरादरम्यान विद्यार्थ्यांनी बियाणे, खते, कीटकनाशके वापर व खरेदीबाबत कशी दक्षता घ्यावी, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती या विषयावर माहिती दिली. पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. त्यात युवकांचा ध्यास ग्राम शहर विकास हा विचार देण्यात आला.

समारोपास केसीई संस्थेचे सहसचिव ॲड. प्रमोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक डॉ. नितीन बडगुजर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी म्हणून प्राध्यापक श्री. गणपत धुमाळे, प्रा. स्वाती लोखंडे यांनी कामकाज केले. शिरसोली येथील पंचायत समिती सदस्य नंदलाल पाटील, बारी समाज विद्यालयाचे अध्यक्ष प्रवीण पाटील, संचालक तथा विद्यार्थी निलेश बारी, सरपंच प्रवीण दामधर, कृषी सहायक कमलेश पवार, कृषी सहायक भारत पाटील व ग्रामस्थांनी सहकार्य केले.



**शिरसोली, जि.जळगाव : शिरसोली (ता. जळगाव) येथे पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी कृषी सहायक भारत पाटील, कमलेश पवार व विद्यार्थी.**

मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिराचे उद्घाटन*

https://satymevjayate.com/?p=30587

[2/7, 17:33] Ganpat Dhumale: *मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिराचे उद्घाटन*

*जळगाव मिरर न्यूज*

https://jalgaonmirror.com/inauguration-of-national-service-scheme-winter-camp-of-maniyar-law-college/

https://chat.whatsapp.com/GcTsI5Teq1bHWdfJhgWKSh
[2/7, 17:39] Shirsoli Nilesh Bari Students: *मणियार विधी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबिराचे उद्धाटन*

08:48
epaperdivyamarathi.bhaskar.com
जळगाव सिटी

ळगाडून
मजून घ्या
ाविद्यालयात संवाद



ा चित्रकार राजू बाविस्कर.

तील कलाकार, कलारसिक
ा कला विभागाचे विद्यार्थी
थत होते. अमूर्त चित्रशैलीत
रातील चित्रप्रदर्शनात
रसिकांनी दिलेली दाद व
ई मिळालेल्या चित्रकृती
स्कर यांनी पीपीटीद्वारे
र्थ्यांना दाखवल्या. या चित्रात
ला काय दिसते? असा प्रश्न
रल्यावर विद्यार्थ्यांनी
त्सकपणे मते मांडली. चित्र
न घेण्यासाठी मनात विचारांचे
काहूर उठावे असे ते म्हणाले.

## विधी महाविद्यालयाचे विशेष हिवाळी शिबिर

**प्रतिनिधी** | जळगाव

खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित एस. एस. मनियार विधी महाविद्यालयाचे शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत विशेष हिवाळी शिबिर घेण्यात आले. शिबिरात 'बेटी बचाव बेटी पढाव', व्यसनमुक्ती, जलसंधारण, मृदसंधारण, आरोग्य, प्रबोधन, स्वच्छता, ग्राहक संरक्षण कायदा, जादूटोणा विरोधी कायदा, आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष असे विविध उपक्रम घेण्यात आले. शिबिरात शिरसोली गावातील टेकडीवर मृदसंधारणाचे काम करण्यात आले. गावात प्रभातफेरी काढण्यात आली. समारोपाला सहसचिव ॲड. प्रमोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. नितीन बडगुजर, प्राचार्य डॉ. बी. युवाकुमार रेड्डी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. गणपत धुमाळे, प्रा. स्वाती लोखंडे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम घेण्यात आले. यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

एक होती ढमी
होती टमी का
दोघी हायवेने चालल्या
ट्रकमध्ये खूप वजन होत
घाटात धूर फेकी. तिथूनच
चालली होती. टमी हल
पाठीमागनं भुर्रकन याय
चमकवायची. पीपीप
ओव्हरटेक करून पुढे
नाकावर टिच्चून! मागे व
म्हणते कशी- 'ढमे, बाई
गं दमानं चालतेस? मी
निघाले, तुझ्या पुढं चालले.
ढमी ट्रक चालत
'नाही गं बाई. मला
ओझं घेऊन चालावं ला
करावे लागतात.' मग
चिडवू लागली. 'ढमी
डिझेल पिते नामी. रस्त्य
कमी. कन्हायला ढुरढुर,
कुरकूर!' ढमी ट्रक मात्र

हे क

प्रयोग दाखवण्यापूर्वी



नारळाच्यातीन
एखादी तार
छिद्र पाडा
नारळ

1 2 3 4






विद्यार्थ्यानी घरोघरी जाऊन कुटुंबांचे सामाजिक आणि आर्थिक स्तर जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण केले.





विद्यार्थी स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी नियमित आरखडयाप्रमाणे सकाळी योग करताना





प्रा. गणपत धुमाळे
कार्यक्रम अधिकारी

डॉ. बी. युवकुमार रेड्डी
प्राचार्य